मराठी भाषा गौरव दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा

# ॥ज्योतिर्मय॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २८ वा ❑ गुरूवार दि.२७ फेब्रुवारी २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

## विशेष लेख...

## ड्युरंड रेषेवर युद्धजन्य स्थिती

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

पाकिस्तान आणि अफगाणिस्तान पुन्हा एकदा आमनेसामने आले आहेत. अफगाण तालिबानी लढवय्यांनी ड्युरंड रेषा ओलांडून पाकिस्तानात प्रवेश केला आहे आणि ते पाकिस्तानी सैन्याशी सामना करत आहेत.अफगाणिस्तानच्या संरक्षण मंत्रालयाचे प्रवक्ते खोवर्झमी यांनी डुरंड रेषेबाबत म्हटले आहे की, आम्ही ते पाकिस्तानी भूभाग मानत नाही. १९४७ पासून पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील सीमा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अफगाणिस्तानने तिला हायपोथेटिकल लाइन असेही म्हटले आहे.

अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधील २६४० किलोमीटर लांबीच्या आंतरराष्ट्रीय सीमेचे नाव ड्युरंड लाईन आहे. ही रेषा पश्तून आदिवासी क्षेत्रातून जाते आणि दक्षिणेकडील बलुचिस्तानपर्यंत पोहोचते. अशाप्रकारे पश्तून आणि बलुचांना दोन देशांमध्ये विभागून ते बाहेर पडते. ही जगातील सर्वात धोकादायक सीमा देखील मानली जाते.

दक्षिण आशियातील त्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी ब्रिटिशांनी ड्युरंड रेषा तयार केली. १८९३ मध्ये ब्रिटिश भारत आणि अफगाणिस्तानच्या अमिराती यांच्यात ते तयार झाले. या सीमेचे नाव सर हेन्री ड्युरंड यांच्या नावावरून ठेवण्यात आले आहे, जे त्यावेळी गुलाम भारताचे परराष्ट्र सचिव होते. तत्कालीन अफगाण शासक अब्दुर रहमान यांच्या सहकार्याने ब्रिटिशांनी ते रेखाटले होते. ब्रिटनने आपल्या हितसंबंधांसाठी रहमानला अफगाणिस्तानची सूत्रे सोपवली होती. डुरंड रेषेचा मोठा भाग पीओकेमधून जातो.

अफगाणिस्तानात तालिबान सत्तेत आल्यापासून डुरंड रेषेवर तणाव वाढला आहे. तालिबान या रेषेला अफगाणिस्तानच्या सार्वभौमत्वाचे उल्लंघन मानतो.पाकिस्तान आणि अफगाणिस्तान दोघेही आपापल्या सीमांवर दावा करतात. येथून, तालिबान समर्थित दहशतवादी संघटना पाकिस्तानात हल्ले करत राहतात.

पाकिस्तान आणि अफगाणिस्तानातील तालिबानी सैन्यात जोरदार गोळीबार सुरू आहे आणि अशा परिस्थितीत तोरखम सीमा बंद करण्यात आली आहे. पाकिस्तानचे हेतू हाणून पाडण्यासाठी तालिबानी सैन्य तोरखम सीमेजवळ एक लष्करी चौकी बांधत होते, ज्याला पाकिस्तानने विरोध केला. त्यानंतर दोन्ही देशांच्या सैन्यात गोळीबार सुरू झाला जो गेल्या ३६ तासांपासून सुरू आहे.दोन्ही देशांमधील सीमा असलेल्या डुरंड रेषेवर युद्धासारखी परिस्थिती निर्माण झाल्याचे पाकिस्तानी माध्यमांनी म्हटले आहे. त्याच वेळी, तालिबान आणि पाकिस्तानी सैन्याने एकमेकांना जोरदार प्रत्युत्तर देण्यासाठी संघर्षाच्या ठिकाणी अतिरिक्त सैन्य पाठवले आहे.

पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील तणाव शिगेला पोहोचला आहे. गेल्या ३६ तासांपासून सुरू असलेल्या गोळीबारामुळे तोरखम सीमा बंद आहे आणि व्यापारही ठप्प झाला आहे. सीमेच्या दोन्ही बाजूला ट्रकच्या लांब रांगा आहेत. त्याचबरोबर सीमेजवळील सामान्य लोकांची ये–जा देखील थांबवण्यात आली आहे.

अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधील व्यापारासाठी तोरखम हा सर्वात महत्वाचा मार्ग आहे. तोरखम सीमा पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा प्रांताला अफगाणिस्तानच्या नांगरहार प्रांताशी जोडते. लढाईच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानी सैन्य आणि तालिबान दोघेही हाय अलर्टवर आहेत. पण हा तणाव थांबवण्यासाठी आतापर्यंत कोणतीही बैठक झालेली नाही.

तुर्की वृत्तसंस्था अनादोलूच्या वृत्तानुसार, तोरखम सीमेजवळ तालिबानने नवीन लष्करी चौकी बांधल्यावरून शनिवारी (२२ फेब्रुवारी) वाद सुरू झाला आणि तोरखम सीमा बंद करण्यात आली. यानंतर दोन्ही बाजूंच्या सैन्याला सतर्क करण्यात आले आहे. सोमवार (२४ फेब्रुवारी) सकाळपर्यंत, सीमा पुन्हा उघडण्याबाबत कोणतीही चर्चा झालेली नाही.

हे लक्षात घेण्यासारखे आहे की अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधील तोरखम सीमेवरून वाद अनेक दशकांपासून सुरू आहे. त्यामुळे हा मार्ग अनेकदा बंद असतो.

# मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आज मुंबईत पुरस्कार प्रदान सोहळा

ज्योतिर्मय साहित्य

**मुंबई** – मराठी भाषेच्या गौरवार्थ आणि मराठी भाषा व साहित्याच्या विकासासाठी कार्यरत असणाऱ्या मान्यवरांच्या सन्मानार्थ उद्या २७ फेब्रुवारी रोजी मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया येथे सायंकाळी ५ वाजता पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

मराठी भाषा गौरव दिन तसेच ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंतीप्रित्यर्थ आयोजित या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानपरिषद सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत, सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार, विरोधी नेते अंबादास दानवे, उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे आदी उपस्थित राहणार आहेत.

मराठी भाषा विभागाअंतर्गत २०२४ करिता विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक रावसाहेब रंगराव बोराडे यांना जाहीर झाला आहे. नामवंत प्रकाशन संस्थेसाठी २०२४ चा श्री.पु. भागवत पुरस्कार हा ज्योत्स्ना प्रकाशन, पुणे या संस्थेला जाहीर झाला आहे. डॉ.अशोक केळकर भाषा अभ्यासक पुरस्कार २०२४ हा डॉ.रमेश सिताराम सूर्यवंशी यांना आणि श्री.मंगेश पाडगावकर भाषा संवर्धन पुरस्कार हा श्रीमती भीमाबाई जोंधळे यांना जाहीर झाला आहे.

याशिवाय ग्रामीण साहित्यासाठी २०२३ चे पुरस्कार जाहीर झाले आहे. वाङ्मय पुरस्कार प्रकारात प्रौढ वाङ्मय अंतर्गत काव्य प्रकारामध्ये कवी केशवसूत पुरस्कार हा एकनाथ पाटील यांना ‘अनिष्ठकाळाचे भयसूचन’ या पुस्तकासाठी जाहीर झाला आहे. नाटक / एकांकिका करिता राम गणेश गडकरी पुरस्कार हा मकरंद साठे यांना, कादंबरीकरिता हरी नारायण आपटे पुरस्कार हा आनंद विंगकर यांना, लघुकथेकरिता दिवाकर कृष्ण पुरस्कार हा दिलीप नाईक–निंबाळकर यांना, ललित गद्यकरिता अनंत काणेकर पुरस्कार अंजली जोशी यांना, विनोदाकरिता श्रीपाद कृष्ण कोल्हटकर पुरस्कार हा शेखर गायकवाड यांना चरित्राकरिता न.चिं.केळकर पुरस्कार हा विवेक गोविलकर, आत्मचरित्रासाठी लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार हा डॉ.वसंत भा. राठोड यांना समीक्षा, संशोधन, सौंदर्यशास्त्र, ललितकला व आस्वादपर लेखनाकरिता श्री. के. क्षीरसागर पुरस्कार हा समीर चव्हाण यांना जाहीर झाला आहे. तसेच प्रौढ वाङ्मय राज्यशास्त्र अथवा समाजशास्त्रकरिता डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कारांसाठी शिफारस नाही.

त्याचप्रमाणे प्रौढ वाङ्मय इतिहासाकरिता शाहू महाराज पुरस्कार हा प्रकाश पवार यांना, भाषाशास्त्र अथवा व्याकरणाकरिता नरहर कुरूंदकर पुरस्कार हा उज्ज्वला जोगळेकर यांना, विज्ञान व तंत्रज्ञानाकरिता महात्मा जोतीराव फुले पुरस्कार हा सुबोध जावडेकर यांना, शेती व शेतीविषयक पुरक व्यवसाय लेखनाकरिता वसंतराव नाईक पुरस्कार हा डॉ.ललिता विजय बोरा यांना, तसेच उपेक्षितांचे साहित्यकरीता लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार हा सुनीता सावरकर यांना जाहीर झाला आहे. तर अर्थशास्त्र व अर्थशास्त्रविषयक लेखनाकरिता सी.डी. देशमुख पुरस्कारांसाठी शिफारस नाही. तत्वज्ञान व मानसशास्त्रकरिता ना.गो. नांदापूरकर पुरस्कार हा या.रा.जाधव यांना, शिक्षणशास्त्राकरिता कर्मवीर भाऊराव पाटील पुरस्कार हा हेमंत चोपडे यांना, पर्यावरणकरिता डॉ. पंजाबराव देशमुख पुरस्कार हा माधव गाडगीळ यांना, संपादित अथवा आधारितसाठी रा.ना.चव्हाण पुरस्कार संपादक रविमुकुल यांना, अनुवादाकरिता तर्कतीर्थ लक्ष्मणशात्री जोशी पुरस्कार हा अनुवादक श्रीकांत अरूण पाठक यांना तर संकीर्णकरिता भाई माधवराव बागल पुरस्कार हा सुप्रिया राज यांना जाहीर झाला आहे.



वाङ्मय पुरस्कार प्रकारात बाल वाङ्मयमध्ये कवितेकरीता बालकवी पुरस्कार हा प्रशांत असनारे यांना, नाटक व एकांकिकाकरिता भा. रा.भागवत पुरस्कार संजय शिंदे यांना, कादंबरी प्रकारात साने गुरूजी पुरस्कार हा रेखा बैजल यांना, कथा प्रकारात राजा मंगळवेढेकर पुरस्कार हा शरद आपटे यांना सर्वसामान्य ज्ञानकरिता यदुनाथ थत्ते पुरस्कार हा डॉ.प्रमोद बेजकर यांना तर बालवाङ्मय संकीर्ण या प्रकारातील ना.धो.ताम्हणकर पुरस्कार हा डॉ.आनंद नाडकर्णी यांना जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे स्वरूप ५० हजार रूपये आहे.

वाङ्मय पुरस्कार प्रकारात प्रथम प्रकाशन अंतर्गत काव्याकरिता बहिणाबाई चौधरी पुरस्कार हा तान्हाजी रामदास बोऱ्हाडे यांना, नाटक/ एकांकिकाकरिता विजय तेंडुलकर पुरस्कार हा हरीष बोढारे यांना, कादंबरी या प्रकारातील श्री.ना.पेंडसे पुरस्कार हा प्रदीप कोकरे यांना, लघुकथेसाठीचा ग.ल.ठोकळ पुरस्कार हा डॉ.संजीव कुलकर्णी यांना, ललितगद्याचा ताराबाई शिंदे पुरस्कार हा गणेश मनोहर कुलकर्णी यांना जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे स्वरूप ५० हजार रूपय असे आहे. तर प्रथम प्रकाशन समीक्षा सौंदर्यशास्त्र या प्रकारातील रा.भा. पाटणकर पुरस्काराकरिता शिफारस नाही.

याचप्रमाणे सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार प्रकारात सयाजी महाराज गायकवाड पुरस्कार हा अनुवादक योगिनी मांडवगणे यांना ‘आल्बेर काम्यू ला मिथ द सिसीफ’ या पुस्तकासाठी जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे स्वरूप १ लाख रूपये आहे.

# ‘अनादी मी अनंत मी’ गीताला पहिला ‘छत्रपती संभाजी महाराज राज्य प्रेरणा गीत’ पुरस्कार

## फ्रान्सच्या मार्सेलिस बंदरातून सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांची घोषणा

ज्योतिर्मय साहित्य

**मुंबई** – कवी मनाचे महान योद्धे छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावाने या वर्षीपासून दिला जाणार पहिला ‘राज्य प्रेरणा गीत पुरस्कार’ स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या ‘अनादी मी अनंत मी’ या गीताला देण्यात येत असल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी फ्रान्सच्या मार्सेलिस समुद्र किनाऱ्यावरुन केली.

ज्या पद्धतीने महाराष्ट्र भूषण आणि अन्य सन्मानाचे पुरस्कार महाराष्ट्र शासनातर्फे देण्यात येतात त्याच पद्धतीने दरवर्षी एका प्रेरणा गीताला महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे ‘छत्रपती संभाजी महाराज राज्य प्रेरणा गीत’ पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. २ लाख रुपये रोख रक्कम व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असेल.

छत्रपती संभाजी महाराज हे एक उत्तम साहित्यिक आणि संस्कृतचे उत्तम जाणकार होते. त्यांनी संस्कृत भाषेत ‘बुधभूषण’ हा ग्रंथ लिहिला, तर ‘नायिकाभेद’, ‘नखशीख’ आणि ‘सातसतक’ हे ब्रज भाषेत ग्रंथ लिहिले आहेत. त्यामुळेच त्यांच्या चरणी नतमस्तक होऊन महाराष्ट्र शासन यावर्षी पासून एका प्रेरणा गीताचा सन्मान करणार आहे.

जन्मापासून मृत्यूपर्यंतचा प्रवास एक मोठा संघर्ष असतो. या संघर्षात संकटसमयी मनाला उभारी देण्याचे काम काव्य पंक्ती करतात, जगण्याला प्रेरणा देतात. म्हणून अशा प्रेरणा गीतांचा सन्मान व्हावा तोही आपल्या स्वराज्यासाठी अफाट संघर्ष करणारे छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावे व्हावा अशी यामागची कल्पना असल्याचे मंत्री ॲड. शेलार यांनी सांगितले.

सावरकर पॅरिसहून लंडनला रेल्वेने आल्यावर ब्रिटिश सरकारने अटक करून त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप करून खटला भरला. त्यांच्यावरचा खटला इंग्लंडमध्ये न चालवता हिंदुस्थानात चालवण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी सावरकरांना लंडनहून मोरिया बोटीने हिंदुस्थानात नेण्यात आले. ती बोट मार्सेलिसच्या बंदरात आल्यावर सावरकरांनी ८ जुलै १९१० या दिवशी ब्रिटिशांच्या ताब्यातून सुटका करून घेऊन भारताला पारतंत्र्यातून मुक्त करण्याचा आपला लढा चालूच ठेवण्यासाठी त्यांनी समुद्रात उडी मारली. सावरकर ६० यार्ड एवढे अंतर पोहून गेले आणि त्यांनी मार्सेलिसचा किनारा गाठला, पण दुर्दैवाने ते पकडले गेले. त्यानंतर आपल्याला इंग्रजाकडून आपला अमानुष छळ होणार हे त्यांच्या लक्षात आलेच होते. त्यावेळी देशासाठी संघर्ष करण्याचे आत्मबळ पुन्हा वाढवण्यासाठी ज्या काव्य पंक्ती त्यांना स्फुरल्या त्या म्हणजे ‘अनादी मी अनंत मी’.. हे गीत होय.’’

हे गीत म्हणजे सावरकरांचे अत्यंत भेदक, प्रेरणा, उर्जा देणारे हे शब्द व ओतप्रोत देशप्रेम याला वंदन करीत हा पुरस्कार जाहीर करीत असल्याचे ॲड.आशिष शेलार यांनी सांगितले. लवकरच समारंभपूर्वक हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल, असे सांगितले.

**पुरस्कारासाठी समिती**

या पुरस्कारासाठी सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून सांस्कृतिक कार्य विभागाच्या अपर मुख्य सचिवांसह सांस्कृतिक संचनालयाचे संचालक, गोरेगाव चित्रनगरी व्यवस्थापकीय संचालक, उपसचिव सांस्कृतिक कार्य, पु. ल देशपांडे कला अकादमी संचालक, दर्शनिका विभाग संपादक या समितीचे सदस्य आहेत. सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार हे फ्रान्स दौऱ्यावर असून, याबाबतची ऑनलाईन बैठक घेऊन यावर्षीचे प्रेरणा गीत म्हणून स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या गीताची निवड एकमताने करण्यात आली असल्याचे सांगितले. या बैठकीला अपर मुख्य सचिव विकास खारगे, सांस्कृतिक संचालक विभिषण चवरे, चित्रनगरीच्या संचालक स्वाती म्हसे पाटील, पु. ल. देशपांडे कला अकादमीच्या संचालक मिनल जोगळेकर आणि डॉ. बलसेकर आदी सदस्य उपस्थित होते. हा पुरस्कार कवींना देण्यात येणार असून कवी जर हयात नसतील तर त्यांच्या नातेवाईक अथवा त्यांचा वारसा सांगणाऱ्या संस्थांना प्रदान करण्यात येणार आहे.

## लक्षवेधी छायाचित्र....



जेष्ठांचा गप्पाकट्टा.......

(छायाचित्र–प्रदिपगुरुजी पिंपळनेरकर) )

# अंतरंगचे तरंग कवितासंग्रहाच्या दुसऱ्या आवृत्तीचे दिल्लीत थाटात प्रकाशन

ज्योतिर्मय साहित्य

**दिल्ली** – सुप्रसिद्ध कवी, गझलकार, गीतकार, समीक्षक विजो (विजय जोशी), डोंबिवली यांच्या अंतरंगाचे तरंग कविता संग्रहाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्ली इथे संपन्न झाले. ज्येष्ठ साहित्यिका नाट्यकर्मी दिपाली काळे (उपाध्यक्षा मसाप डोंबिवली), ज्येष्ठ कवयित्री साहित्यिका उमा आवटे (कार्यवाह मसाप डोंबिवली) ज्येष्ठ मार्गदर्शक साहित्यिक श्रीकांत पावगी सर, डोंबिवली... या मान्यवरांच्या हस्ते या संग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. या बद्दल कवी विजो यांचे साहित्य क्षेत्रात सर्वत्र कौतुक आणि अभिनंदन होत आहे.

– प्रदीप बडदे, (नवी मुंबई)





- विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com



## आनंदी पहाट...

## अनुकरण कोणाचे करावे ह्याचे भान हवे

**ज्योतिर्मय साहित्य**

लहापणापासून आपल्या बालमनावर मित्र परिवारातील प्रत्येकाचा कमी-अधिक प्रमाणांत चांगला-वाईट परिणाम होत असतो. अनकेदाआपल्या अनुकरणप्रिय मनाला मित्रमंडळीत सतत राहून त्यांचे अनुकरण करायची सवय जडलेली असते. आपण ज्या परिसरांत, वातावरणांत वावरत असतो, त्याचा थेट परिणाम आपल्या अंतर्मनावर होत असतो. आपल्या सोबत्यांचा आपल्या कार्यावर, व्यक्तिमत्वावर, वागण्या-बोलण्यावर, व्यवहारावर आणि चैतन्यावर प्रखर प्रभाव पडत असतो. म्हणून आपल्या सभोवती सुस्वभावी, धार्मिक, उच्च स्तरावर जागृत मनोवृत्तीचे लोक असणे महत्वाचे असते. जशी आपली संगति, तशी आपली मनोवृत्ती, ही बाबही तितकीच महत्वाची आहे.

आपण आपल्या सोबत्यांची निवड विवेकपूर्वक करत असल्याची आपल्याला जाणीव होणे जरुरीचे असते. कारण, आपली संगत आपल्यावर वाईट प्रभाव पाडू शकते, ह्याचे विस्मरण होऊन चालणार नाही. जगण्यापलीकडचे जीवन जगताना संगत ही खूप महत्वाची बाब असते. जीवनात यशस्वी होण्यासाठी जशी उच्च शिक्षणाची गरज असते, तशीच प्रत्येक व्यक्तीला चांगल्या संगतीची सुद्धा गरज असते,हे प्रत्येक व्यक्तीने कधीही विसरून चालणार नाही.

प्रत्येक व्यक्तीची ओळख त्या व्यक्तीच्या मित्रांवरून होत असते. जगात सुष्ट-दुष्ट, चांगली-वाईट, जवळची-लांबची, आपली-परकी अशी माणसे असतातच. समविचारी माणसांची आपापसांत मैत्री लवकर होत असते. वाईट संगतीत वाईट गुण आपल्यात येण्यास वेळ लागत नाही. श्रेष्ठ व्यक्तीच्या सहवासात सामान्य माणूस आला तरी त्याचा कायापालट होतो. परीसाच्या संगतीत लोखंड आल्यावर त्याचे सोने होते. त्यासाठी संगतीचा परिणाम विपरीत ठरू नये, हेही लक्षात घ्यावे.

## निवडक पण दर्जेदार गीते देणारा संगीतकार : खय्याम

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

उमराव जान या चित्रपटाला संगीत देताना ते थोडे घाबरले होते. त्याचे कारण म्हणजे त्याच्या काही दिवस आधीच तशीच पार्श्वभूमी असलेला पाकिजा हा मीनाकुमारी आणि राजकुमार यांचा चित्रपट प्रदर्शित झाला होता. त्यातील गाणी हिट झाली होती. त्यांना साधारणपणे तशीच गणिकेची पार्श्वभूमी असणाऱ्या उमराव जान या चित्रपटाला संगीत द्यायचे होते. खय्याम यांनी त्यासाठीच्या तयारीत कोणतीच कसर ठेवली नाही. त्या काळातील लोकजीवन, संगीत आदी सर्व गोष्टींचा बारकाईने अभ्यास केला. उमराव जान हा चित्रपट उमराव जान अदा या कादंबरीवर आधारित होता. तिचा अभ्यास केला. त्यांच्या कठोर परिश्रमांना यश आले. उमराव जान मधील सगळी गाणी ऑल टाइम हिट ठरली. गायिका आशा भोसले यांनी या गाण्यांचे आणि अभिनेत्री रेखा यांनी त्या भूमिकेचे सोने केले.



## उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२



खैय्याम यांनी आपल्या संगीतात राग पहाडी, राग यमन यांचा अत्यंत चपखलपणे वापर केला. त्यांची गाणी जणू जखमेवर हळुवार फुंकर घालणारी ! फुलांच्या ताटव्यावरून येणारी शीतल, सुगंधी हवेची झुळूक ! लतादीदींच्या आवाजातील सौंदर्य खैय्याम यांच्या संगीतात विशेष खुललं. शंकर हुसैन या चित्रपटातील लतादीदींच्या आवाजातील कहीं एक मासूम नाजूक सी लडकी, आप यूं फासलों से गुजरते रहे आणि अपनी आप रातोमे ही तिन्ही गाणी अप्रतिम. अपनी आप रातों में ... हे गाणं तर आपल्याला एका वेगळ्या ट्रान्समध्ये घेऊन जातं. या गाण्यांचा उल्लेख उदाहरणादाखल केला आहे. त्यांच्या संगीत निर्देशनात दीदींनी गायलेली सगळीच गाणी अप्रतिम आहेत. त्यातील काही पुढे देणारच आहे.

खैय्याम यांना आपल्या संगीतातील योगदानासाठी लता मंगेशकर पुरस्कार, नौशाद सन्मान, संगीत नाटक अकादमी पुरस्कार इ पुरस्कार मिळाले. तीन वेळा ते फिल्म फेअर पुरस्काराचे मानकरी ठरले. २०११ मध्ये ते पदमभूषण पुरस्काराने सन्मानित झाले. खैय्याम हा अतिशय जिंदादिल माणूस होता आणि तशीच त्यांची गाणीही. आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांनी जवळपास दहा ते बारा कोटींची संपत्ती नवोदित कलाकारांसाठी असलेल्या ट्रस्टला दान केली. १९ ऑगस्ट २०१९ या दिवशी खैय्याम यांचे निधन झाले. पण आपल्या संगीतच्या रूपाने ते अजरामर आहेत. त्यांची गाणी रसिकांच्या ओठांवर कायम राहतील. खैय्याम यांची काही लोकप्रिय गाणी उदाहरणादाखल पुढे देत आहे.

बहारों मेरा जीवन भी संवारो... ( आखरी खत ), कभी कभी मेरे दिल मे ( कभी कभी ), आजा रे मेरे दिलबर आजा ( नुरी ), करोगे याद तो ( बाजार ), दिखाई दिये यु ( बाजार ), फिर छिडी रात ( बाजार ), ना जाने क्या हुआ ( दर्द ), मोहोब्बत बडे काम की चीज है ( त्रिशूल ), जाने मन तुम कमाल करती हो ( त्रिशूल ), सिमटी हुई ये घडिया ( चंबल की कसम ), जलता हैं बदन ( रजिया सुलतान ), हजार राहे ( थोडी सी बेवफाई ), तेरे चेहरे से नजर नही हटती ( कभी कभी )



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## रजोगुण लक्षण

**ज्योतिर्मय साहित्य**

दुसऱ्या चे वैभव पाहिले आणि माझ्या जवळ असे वैभव नाही असे म्हणून जो अस्वस्थ होतो तो रजोगुणी होय. डोळ्यांनी जे जे पाहिले ते ते मज हवे अशा नितिने जो वागतो तो रजोगुणी होय. समोरच्याची टवाळी, थट्टामस्करी करतो, निंदानालस्ती करतो, ज्याच्या बोलण्याने वाद वाढतो, कलह होतो. जो सतत विहीतकर्म न करता थट्टा हास्यविनोदात दिवसचे दिवस घालवतो, व्यसनांचा गदारोळ घालतो,जो ऐशारामी जीवन जगतो, जो वाईट सवयी मनापासून स्विकारतो,ऊदा सतत नाटक, सिनेमे बघणे व स्वतःच्या आयुष्यात त्यातील पात्रांचा संबध जोडून विनाकारण आपल्या आयुष्याची होळी करून घेतो,वाईट सवयीचं मनापासून स्विकारतो. निरनिराळ्या खेळात पैसे घालतो, अमंल व धुंदी आणणार्या पदार्थांचा वापर करतो, गावगुंड, नाना भानगडीत पडून स्वतःच्या मनाला येईल तसे बेताल वागतो, वाईट लोकांच्या संगतीत रहातो. तो रजोगुण होय.

रजोगुणी व्यक्तीला परमात्मा चे ज्ञान नसते. सर्व दृष्य वस्तुवर खरे प्रेम असते पण त्याला समजत नाही की हे प्रेम शाश्वत नाही ते फसव आणि बेगडी प्रेम आहे हे न समजल्या मुळ् कित्येकांच्या आयुष्याची माती झालेली आपण बघतो.मन आसक्तीत गुंतल्यामुळे तो जन्म मरण्याच्या फेर्यात अडकतो. संसाराची बंधने तुटता तुटत नाहीत.

यावर ऊपाय काय तर ऊपाय ऐकच भगवत् भक्ती वाढवावी काया, वाचा, मनाने देवाला पान, फुल पाणी दुधसाखर द्यावी. आपणास शक्य असेल तसं दानधर्म करावा. संसारातील सुखदुःख भोगत असताना सर्व चित्त फक्त भगवंताचे चरणीं असावे. अशा शबल किंवा समिश्र रजोगुणाचे वर्णन आहे. नेहमी प्रमाणे म्हणते की मला जसे समजले तसे समासाचा विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे, शक्यतो रजोगुण नकोच.

श्री राम जय राम जय जय राम

जय जय रघूविर समर्थ **(क्रमशः)**



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## गोंदवल्याचे महत्त्व नामाच्या प्रेमात आहे

**ज्योतिर्मय साहित्य**

ज्याप्रमाणे एखादा बाप बँकेत पैसे ठेवतो आणि त्याचे व्याज आपल्या मुलाला आपल्या पश्चात् मिळण्याची व्यवस्था करतो, त्याचप्रमाणे, ज्यांची बुद्धी भ्रष्ट झाली आहे त्यांना, निदान अंतकाळी तरी, सद्बुद्धीचे व्याज मिळण्यासाठी भरपूर भांडवल मी गोंदवल्यास ठेवले आहे. मनुष्य कितीही भ्रष्ट बुद्धीचा झाला तरी गोंदवल्याला आला की त्याच्या बुद्धीचा पालट झालाच पाहिजे. निदान अंतकाळी तरी तो तिथे येऊन चांगला मरेल. अभिमान म्हणून नव्हे, परंतु गोंदवल्याचे महत्त्व कशात असेल तर ते नामाच्या प्रेमात आहे. राम किती दयाळू आहे ! त्याच्या नामाचा प्रसार व्हावा म्हणून त्याच्या नावाने मी हा बाजार मांडला. पहिल्याने वाटले, आपला माल खपेल की नाही कुणास ठाऊक ! पण रामाने मोठी कृपा केली, आणि पुष्कळ लोक नामाला लागले. आपण पाहतो, प्रत्येक गावाला निरनिराळे नाव असते. तसे पाहिले तर सर्व गावे सारखीच; घरेदारे, भिंती, शाळा, धर्मशाळा, चावड्या या प्रत्येक गावात असतात. परंतु प्रत्येक गावाचे महत्त्व काही वेगळे असते. गोंदवल्यास पैशाचे महत्त्व नाही, परंतु तिथे नामाचे पीक भरघोस आहे. मी नेहमी हेच सांगत असतो की, जिथे जे उगवेल तेच तुम्ही पेरा. इथला कोणताही भक्त कुठेही जरी दिसला, तरी त्याच्या वागण्यावरून कळून आले पाहिजे की, हा गोंदवल्याचा भक्त असला पाहिजे. त्याचे तोंड सारखे हलते आहे, तोंडाने रामाचा जप चालू आहे, त्याअर्थी हा अमक्या गुरूचा शिष्य असला पाहिजे, असे कळून यायला हवे. म्हणतात ना, की आपल्या वडिलांचे महत्त्व सांगू नये, ते मुलाच्या कृतीवरून कळले पाहिजे. म्हणून आता एकच करा, रामाला हात जोडून मनापासून सांगा, '' रामा ! तुझे प्रेम असू दे, आम्ही अखंड नामात राहू. प्रारब्धाचे भोग आम्ही आनंदाने भोगू, आणि तू ठेवशील त्यात आनंद मानू. तुझे गोड नाम आम्ही हृदयात सतत जतन करून ठेवू.'' राम खात्रीने कृपा केल्यावाचून राहणार नाही. खरोखर, या नामामध्ये आपला प्रपंच आपल्या कल्पनेपेक्षा कितीतरी सुखाचा होईल ! लढाई करणे हे अर्जुनाचे कर्तव्य असल्याने, तू माझे स्मरण ठेऊन लढाई कर, असे भगवंतांनी सांगितले. आज नोकरी किंवा प्रपंच करणे हे आपले कर्तव्य आहे; तेच आपण भगवंताच्या स्मरणात करू. नीतिधर्माचे आचरण, आणि प्रारब्धाने आलेली कामे भगवंताच्या स्मरणात करणे, हेच सर्व धर्माचे, शास्त्रांचे सार आहे. आपण साखर खाल्ली तर आपल्याला गोड लागते, त्याचप्रमाणे आपण गोड शब्द बोललो की आपल्याला गोड शब्द ऐकायला मिळतात. आपल्या सर्व गोष्टी जर भगवंताच्या नामात झाल्या, तर भगवंताचे प्रेम आपल्याला का बरे मिळणार नाही ? आपण भगवंताचे नाम घ्यायला सुरुवात करू या. तेच नाम भगवंताची प्राप्ति करून द्यायला समर्थ आहे याची खात्री बाळगा. प्रपंचाचा अनुभव कष्टमय आहे, पण भगवंताचा अनुभव खासच आनंदमय आहे.

३३९. जो माझा म्हणवतो त्याला नामाचे प्रेम असलेच पाहिजे.



अरुण वि. देशपांडे-पुणे
9850177342

## आनंदाची लेणी

## लेखनाचा आनंद घ्यायला हवा..

**ज्योतिर्मय साहित्य**

नोकरीत असतांना लेखन-बंधने होती, साहित्यिक उपक्रमात सहभागी होणे सहज शक्य नव्हते म्हणून सहभाग नसायचा. ही परिस्थिती २००६ पासून पूर्णतः बदलून गेली आहे. स्वेच्छा-निवृत ''होऊन मला जवळजवळ दोन दशके होत आहेत. मनोसक्त ,मनमुराद लेखनात, वाचनात मी स्वतःला गुंतवून ठेवलेले आहे.

लायब्ररीतुन आत्मचरित्रे, कादंबऱ्या, कथासंग्रह, फिल्म-संगीत विषयक पुस्तके '' आणि कविता संग्रह '' आणून, चौफेर वाचन मी सतत करीत असतो.

आयुष्य -प्रवासात मला ''लेखणी-सखी भेटली, या मैत्रिणीच्या सहवासात गेली ४० वर्षे माझे लेखन अखंडपणे चालू आहे.

२०११ पासून इंटरनेट माध्यमांशी जुळवून घेणे जमल्यापासून माझ्यासाठी नवे विशाल जग खुले झाले.

इंटरनेट वरील साहित्यविषयक बहुतेक सर्व प्लॅटफॉर्म वर माझे लेखन उपलब्ध आहे.

काही महिन्यांपूर्वी ''गप्पा-गोष्टी-गाणी '' या नावाचे माझे युट्युब चॅनेल सुरू केले आहे, ''साहित्यिक युट्युबर''

म्हणून या आधुनिक जगात मी प्रवेश केला आहे. या माध्यमावरील माझ्या लेखन सहभागास वाचक मिळत आहेत.

मित्रांनो आपल्याला जो छंद आहे, ज्या गोष्टींची आवड आहे, त्या मनापासून जपाव्या म्हणजे आपण त्यात गुंतून राहतो, यात आनंद मिळतो, मन सैरभैर होत नाही.

साहित्यिकांसाठीची महत्वाची त्रि-सूत्री लक्षात असू द्या-

लेखनात सातत्य हवे, लेखनात अभ्यास हवा, आणि लेखनाचा सतत सराव हवा '',

या गोष्टी मी अभ्यासपूर्वक लेखन-आचरणात आणतो.

लेखनासाठी प्रिंट मीडिया आणि ई-मीडिया ''ही माध्यमे उपलब्ध आहेत, यावर लेखन-सक्रिय होण्याचा प्रयत्न करावा.

मी रोजच्या रोज व्हाट्सप, इंस्टाग्राम, फेसबुक, युट्युब यावर माझे लेखन-पोस्ट करीत असतो. ''मला वेळ पुरत नाही'' , म्हणण्या इतका मी यात गुंतून गेलो आहे.

सत्तरी ओलांडलेला जेष्ठ नागरिक असलो तरी महत्वाचे म्हणजे मी अजूनही सक्रिय आणि लिहित्या हाताचा लेखक-कवी आहे'', ही ईश्वरी-कृपा म्हणावी.

मित्र हो- लेखन ''माझ्या जीवनाचा अविभाज्य भाग झालेला असल्याने माझे लेखन तुमच्या वाचनात यावे, ही ओढ देखील कायम आहे.

***



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

असन्तो नाभ्यर्थ्याः सुहृदपि न याच्यः कृशधनः
प्रिया न्याय्या वृत्तिर्मलिनमसुभङ्गेऽप्यसुकरम् ।
विपद्युच्चैः स्थेयं पदमनुविधेयं च महतां
सतां केनोद्दिष्टं विषममसिधाराव्रतमिदम् ।।

अर्थ - सज्जन लोक दुर्जनांकडे याचना करू शकत नाहीत. ज्याच्याकडे अल्पधन आहे, अशा मित्राकडेही मागू शकत नाहीत. प्रिय आणि न्यायपूर्ण आजीविकेनेच काम चालवायचे आहे. प्राणांतीही अनुचित कर्म करू शकत नाहीत. विपत्तीतही स्वाभिमानाने रहावे लागते. श्रेष्ठ जनांच्या मार्गाचे अनुसरण करून व्यवहार करावा लागतो. अशा तलवारीच्या पात्यावर चालण्याप्रमाणे कठिण व्रताचा उपदेश सज्जनांना कोणी केला असेल बरे ?

सज्जनांचा जगण्याचा मार्ग म्हणजे तलवारीच्या पात्यावर चालण्यासारखा असतो. याचना न करता, कोणासही न फसविता, स्वाभिमानाचे संरक्षण करीत, श्रेष्ठ जनांच्या मार्गाचे अनुसरण करीत करीत ते आपला व्यवहार पार पाडीत असतात.

## आचरणात आणावे असे



**ज्योतिर्मय साहित्य**

चांगल्या गोष्टी घडत नसतात, त्या घडवाव्या लागतात त्यासाठी योग्य ''वेळी'' योग्य ते ''निर्णय'' घ्यावे लागतात, केलेले ''उपकार'', दिलेला ''शब्द'' आणि उपयोगी पडलेली ''माणसं'' कधीही विसरायची नसतात. म्हणून आयुष्यातील प्रत्येक क्षणाचा फायदा घ्यावा पण कुणाच्या परिस्थितीचा किंवा विश्वासाचा नाही. आयुष्याच्या वाटेवर एका चुकीमुळे साथ सोडणारे भरपूर असतात पण. चूक समजावून सांगून, आयुष्यभर साथ देणारे लाखात एक असतात. जेंव्हा निर्णयाच्या क्षणी आपण स्वतंत्र असतो , तेंव्हा एक तर यशाच दार उघडेल किंवा अनुभवाच.

खोटं सहज विकलं जातं कारण सत्य विकत घेण्याची प्रत्येकाची ऐपत नसते. मनाला वाटेल ते करा पण मनाला लागेल असं काही करु नका. म्हणून अट्टाहासाने जोपासलेला राग, दुसऱ्याने भरलेले कान आणि वैर भावनाच माणसाला अनेकदा हरवते. हे ज्यांना समजत नाही, त्यांना आपण कशाने हरलो हे आयुष्यभर उमगत नाही असे समजतात आयुष्यातल्या असंख्य समस्यांची फक्त दोनच कारणं असतात एकतर आपण विचार न करता कृती करतो किंवा कृती करण्याऐवजी फक्त विचारच करत बसतो.



## आरोग्य संजीवनी

## उजव्या बाजूला पोटात दुखणे याची कारणे

**ज्योतिर्मय साहित्य**

काहीवेळा आपल्या पोटात उजव्या बाजूला वेदना होऊ लागतात. या पोटदुखीची वेगवेगळी कारणे असू शकतात. कारण आपल्या पोटात उजव्या बाजूस यकृत, पित्ताशय, आतड्याचा उजवीकडील भाग, अपेंडिक्स, उजव्या बाजूची किडनी तसेच स्त्रियांमध्ये असे अवयव असतात, त्यामुळे विविध कारणांमुळे उजव्या बाजूला पोटदुखी होऊ शकते. पोटात उजव्या बाजूला दुखणे याची कारणे व त्यावरील उपाय याविषयी माहिती डॉ. सतीश उपळकर यांनी येथे दिली आहे.

पचनासंबधित गॅसेस, अपचन, बद्धकोष्ठता :

गॅस्ट्रोएन्टेरिटिस, इरिटेबल बोवेल सिंड्रोम अन्न विषबाधा अशा कारणांनी उजव्या बाजूस पोटात दुखू लागते.

अपेंडिक्सला सूज आल्याने पोटात उजवीकडे दुखते.

उजव्या किडनीत स्टोन किंवा इन्फेक्शन झाल्याने पोटात उजव्या बाजूला दुखते.

हर्नियामुळे सुध्दा काहीवेळा उजव्या बाजूला पोटदुखी होते.

यकृताला सूज येणे, यकृताचे आजार तसेच पित्ताशयातील खडे यामुळेही उजव्या बाजूला पोटात दुखू लागते.

स्त्रियांमध्ये मासिक वेळी, तसेच गरोदरपणात मुळे उजव्या बाजूला पोटात दुखू शकते.

कधी डॉक्टरांकडे जाणे आवश्यक आहे ? :

खालील लक्षणे जाणवत असल्यास त्याकडे दुर्लक्ष न करता, तातडीने आपल्या डॉक्टरांकडे जावे.

पोटात उजव्या बाजूला अतिशय वेदना होणे,

छातीत दुखणे,

ताप येणे,

शौचावाटे रक्त पडणे,

लघवीतून रक्त पडणे,

उलट्या होणे,

उलटीतून रक्त पडणे,

त्वचा पिवळसर होणे,

पोटावर सूज येणे

अशी लक्षणे दिसून आल्यास तातडीने आपल्या डॉक्टरांकडे जावे.

*पोटात उजव्या बाजूला दुखणे यावर घरगुती उपाय :*

अर्धा कप पाण्यात लिंबू रस व काळे मीठ घालून ते मिश्रण प्यावे.

गरम पाण्यात अर्धा चमचा ओवा मिसळून ते पाणी प्यावे. यामुळे उजव्या बाजूला पोटात दुखणे थांबते.

आल्याचे तुकडे पाण्यात घालून ते पाणी उकळावे. मिश्रण कोमट झाल्यावर ते पाणी अर्धा कप प्यावे.

चहामध्ये आले टाकून काळा चहा प्यावा.

डाळिंबाच्या दाण्यात थोडे काळे मीठ मिसळून ते दाणे खाल्याने उजव्या बाजूला पोटात दुखणे थांबते.

पोटावर गरम शेक घ्यावा.

हे घरगुती उपाय खानपान संबंधित गॅसेस, अपचन, बद्धकोष्ठता अशा कारणांमुळे पोटात उजव्या बाजूला दुखत असल्यास उपयोगी पडतात. मात्र जर इतर गंभीर कारणामुळे पोटात उजवीकडे दुखत असल्यास त्यावर घरगुती उपाय करीत वेळ वाया घालवू नये. अशावेळी तात्काळ डॉक्टरांकडे जाऊन उपचार घ्यावेत.

***

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

अना ही मूर्तिमंत सौंदर्याचं प्रतीक होती. सौंदर्य तिच्या दिसण्यात जेवढं होतं तेवढंच तिच्या वागण्याबोलण्यातही होतं. रवींद्रनाथही अत्यंत देखणे होते. रवींद्रनाथांच्या देखणेपणाची ती तारीफ करत असे. तिचं नाव जरी अन्नपूर्णा असलं तरी रवींद्रांनी आपल्यासाठी खास एखादं नाव ठेवावं असं तिला वाटत होतं. रवींद्रनाथांनी तिच्यासाठी नलिनी या सुंदर नावाची निवड केली. रवींद्रनाथ तिच्याकडे साधारणपणे दोन महिने राहिले. ते तिला आपल्या कबिकाहिनी ( कवी कथा ) या काव्याचा अनुवाद करून ऐकवीत असत. ज्या भारती मासिकात हे काव्य प्रकाशित झालं होतं, त्या मासिकाचा अंकही त्यांनी तिला भेट म्हणून दिला होता.

मुंबईतील दोन महिन्यांच्या वास्तव्यानंतर रवींद्रनाथ इंग्लंडला निघून गेले. पण तर्खड कुटुंबियांना रवींद्रनाथ आणि अना यांच्या नात्याचा अंदाज आला होता. त्यांनी रवींद्रनाथ आणि अना यांच्या लग्नाचा प्रस्ताव टागोर कुटुंबीयांकडे पाठवला होता. पण अना ही रवींद्रनाथांपेक्षा वयाने मोठी असल्याने टागोर कुटुंबीयांनी या प्रस्तावाला नकार दिला. पुढे अनाचे लग्न बडोदा कॉलेजचे उपप्राचार्य हॅराल्ड लिट्लडेल यांच्याशी झाले. या विवाहाला तिची संमती होती का किंवा तिने हे लग्न कसं स्वीकारलं हे एक गूढच आहे. पुढे त्यांच्यासोबत ती स्कॉटलंडमध्ये स्थायिक झाली. पण तिला तेथील हवामान न मानवल्याने ती आजारी पडली आणि तिचे वयाच्या अवघ्या ३३ व्या वर्षी निधन झाले.

अना आणि रवींद्रनाथ यांच्यातील संबंध केवळ शारीरिक आकर्षण या पातळीवर नव्हते. त्यांच्यातील अस्फुट, अव्यक्त प्रेमसंबंध हे दोघांच्याही जीवनावर कायमस्वरूपी प्रभाव पाडणारे होते. हॅरोल्ड लिट्लडेल यांच्याशी विवाह झाल्यानंतरही अनाने आपले नलिनी हेच नाव कायम ठेवले होते. तर रवींद्रनाथ आपल्या आयुष्याच्या अखेरीपर्यंत अनाला विसरू शकले नाहीत. त्यांच्या काव्यात ती आजही जिवंत आहे. बंगाली सण, उत्सवात अनेकदा गायिल्या जाणाऱ्या रवींद्र संगीतात प्रेमाचा अप्रतिम संगम आहे. भलोभेसे शोखी, निभ्रते जोतोन ( हे प्रिये, तुझ्या आत्म्याच्या मंदिरात प्रेम आणि प्रेमाने माझे नाव लिही. ) रवींद्रनाथांचं अनावर असणारं प्रेम शेवटपर्यंत जरी कायम असलं तरी ते दैहिक नव्हतं. त्यांच्या काव्याची ती प्रेरणा जरूर ठरली. पण आपली पत्नी मृणालिनीदेवी यांच्यावर रवींद्रनाथांनी निस्सीम प्रेम केलं. मृणालिनी ही त्यांच्या जगण्याची ओढ होती, त्यांच्या कार्याला प्रेरणा देणारी होती. असंही म्हणता येईल की अना आणि रवींद्रनाथ यांचं नातं नितळ, पारदर्शी होतं. काही नाती अशीही असतात की ज्यांना आपल्या नात्याचं स्पष्टीकरण देण्याची गरज नसते. रवींद्रनाथ आणि अना या दोघांचंही नातं अशाच प्रकारचं पारदर्शी आणि नितळ होतं. ते निभावण्यामागे दोघांच्याही मनाचा मोठेपणा दिसतो. खरोखरीच हेवा वाटावा अशा प्रकारचं हे नातं होतं.

रवींद्रनाथांच्या अनेक कवितांची नलिनी ही प्रेरणा ठरली. त्यांच्या शैशवसंगीत या काव्यसंग्रहातील अनेक कविता तिच्याबद्दलची भावना व्यक्त करणाऱ्या आहेत. त्यांची एक कविता शुन नलिनी खोल गो आँखि ( ऐक नलिनी उघड नेत्र ), तसेच आमि स्वप्ने रयेछि भोर, सखी आमारे जागायो ना ( मी स्वप्नात रमलो आहे, सखी मला जागे करू नकोस. ) यासारख्या कविता तिच्यावरच आहेत.याशिवाय १८८४ साली रवींद्रनाथांनी नलिनी या नावाचं एक नाटकही लिहिलं होतं. या नाटकाची स्मरणपत्रिका त्यांनी कोरीच ठेवली होती. त्यांना हे नाटक तिला अर्पण करायचं होतं असं सांगितलं जातं. **(क्रमशः)**

# शाम ए गझल

ज्योतिर्मय साहित्य

पंढरी क्षेत्रात संगीत हे काही नवीन नाही. अगदी पुरातन काळापासून संगीत सभा या होत आलेल्या आहेत. अभंगवाणी कार्यक्रम असो किंवा शास्त्रीय संगीत मैफिल असो ह्या पंढरपूरी झालेल्या आपण पंढरपूरकरांनी ऐकलेल्या आहेत.पण गझल मैफिल आज म्हणजे शनिवारी प्रथमच ऐकायला मिळाली.

पंढरपूरला संगीत कार्यक्रम रसिक मंडळाच्या वतीने करण्यात येत होते. कै.बा.रा.रत्नपारखी सर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी कित्येक वर्ष तीन तीन दिवसांचे कार्यक्रम भरविले जात होते. लहानपणापासून अशा मैफली ऐकायला मिळाल्या. कारण सर्व कार्यक्रम कवठेकर प्रशालेत घरा जवळ होत.तसेच स्वर साधनेचे खडके सर व बंधू यांनी ही बरेच वर्षे विविध ठिकाणी तनपुरे मठ, बंकटस्वामी मठ, मनमाडकर आश्रम अशा ठिकाणी कार्यक्रम घडवून आणले. आम्हाला जन्माला लवकर घालणार्या देवाचे आभार!!कारण लवकर जन्मल्यामुळे ख्यातकीर्त गायक, वादक, नृत्य, नाटक, कलाकारांना ऐकता आलं.

आज प्रेक्षकही नेहमीचे नव्हते. अभिजात शास्त्रीय संगीत ऐकणारे नेहमीचे प्रेक्षक आज दिसले नाहीत. आज गझल आवडणारे प्रेक्षक होते.

असा गझल कार्यक्रम आज पहिल्यांदाच पंढरीत ऐकायला मिळाला.नंतर समजले की बेले यांचा ही कधी काळी कार्यक्रम झाला होता. पण अलीकडे झालेला हा पहिलाच कार्यक्रम होता. पंढरपूर जवळच्या सोनके गावचे सुपुत्र वैभव केंगार यांच्या गझल गायनाचा कार्यक्रम !!गझल गायक स्व.जगजीत सिंह यांच्या स्मरणार्थ झालेला हा कार्यक्रम. वैभव केंगार यांना मनमाडकर यांच्या प्रांगणात होणाऱ्या वेगवेगळ्या कार्यक्रमात कधी साथ देताना कधी तंबोरा साथीला बसलेले पाहिलं आहे. पण आज हा मुलगा स्वतंत्र, स्वतः चा गझल कार्यक्रम करतो आहे हे प्रत्यक्ष





दत्ता तरलगट्टी

कार्यक्रम पाहिल्यावर समजून आले.गझल ऐकण्याची गोडी मला आमचे मेव्हणे प्रकाश कानडे यांनी लावली. त्याच्या मित्रांसोबत बसल्यावर त्या ऐकल्या. काहीचे दर्दभरी अर्थ समजावून सांगितले. तेव्हापासून जगजीत सिंह यांच्या गझला ऐकतो आहे.

होठोसे छू लो... झुकी झुकी सी नजर.....

होशवालो को पता क्या बेखुदी क्या चिज है..... अशा एकाचढ एक अशा गझल त्याने सादर केल्या. खूप सुंदर पध्दतीने त्याचे सादरीकरण होते. सुत्रसंचालकाची बहारदार आणि खुमासदार भाषेतून वातावरणात चार चांद लावले. नुसते खुमासदार होतं असे नाही तर त्याने वैभवच्या डोळ्यातून अश्रू ही ओघळायला लावणारे दर्दभरे शब्द ही होते. त्याच्या सर्वच साथीदारांनी त्यास खूप छान साथ दिली. ढोलक वादक आणि तबला वादक हे पंढरीच्या जवळपासच्या गावातील होते. सिंथेसायझर, व्हायोलिन वादक यांनी दिमाखदार साथ संगत दिली. मराठी मधील गझलकारांच्या गाजलेल्या गझला वैभव तुझ्या कडून परत केव्हा तरी ऐकायला मिळतील ऐवढीच अपेक्षा. वैभव याचा भविष्यकाळ वैभवशाली असेल हे नक्की !!!

गझल कार्यक्रमानंतर उत्स्फूर्तपणे भक्ती रत्नपारखी, मला व आणखी काही प्रेक्षकांना कार्यक्रमा विषयी मनोगत व्यक्त करण्यास सांगितले. प्रेक्षक म्हणून हे ही नवीन होते. एक सुंदर शाम ए गझल!!! वैभव केंगार आणि सहकारी यांचे अभिनंदन व पुढील मैफिलीस शुभेच्छा!!!

## अल्पसंख्यांक विकासाच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणार -ना.ललित गांधी

ज्योतिर्मय साहित्य

**लातूर** – अल्पसंख्यांक विकासासाठी राज्य सरकारने मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ आणि महाराष्ट्र राज्य जैन अल्पसंख्यांक महामंडळाची स्थापना केली आहे. यामध्ये जैन अल्पसंख्यांक महामंडळाचे अध्यक्ष ना. ललित गांधी यांनी विकासाच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणार, असे आश्वासन सकल जैन समाज संघाच्या वतीने नांदेड येथील नियोजन भवन येथे आयोजित जैन सन्मान सोहळा २०२५ येथे केले.



जैन समाज काही ठिकाणी श्रीमंत, तर काही ठिकाणी अत्यंत गरीब आहे. आपल्या परिस्थिती उंचावण्यासाठी त्यांचा आर्थिक स्तर उंचावणे आवश्यक आहे. यासाठी राज्य शासनाने जैन आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली असून, त्याच्या प्रथम अध्यक्षपदी ना. ललित गांधी (राज्यमंत्री दर्जा) यांची नियुक्ती केली आहे. सकल जैन समाज संघ नांदेडच्या वतीने त्यांचा नियुक्तीबद्दल नागरी सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ते समाज बांधवांशी संवाद साधत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आनंदजी जैन, तर प्रमुख पाहुणे म्हणून नांदेड भूषण डॉ.बाळासाहेब साजणे , उद्योगपती फुलचंदजी जैन (रवि मसाले) आणि नांदेड येथील सर्व मंदिरांचे अध्यक्ष उपस्थित होते. याप्रसंगी सकल जैन समाज सेवा संघाच्या वतीने डॉ. सौरभ जोगी, डॉ. रूपाली जैन, प्रा. डॉ.सुनिता सांगोले यांचा विशेष सन्मान, तर जैनभूषण पुरस्कार प्रदान करून श्रीकांत काळे परभणी, पत्रकार विजय चोरडिया, मनिष जैन छत्रपती संभाजीनगर, अॅड. कांचनमाला संगवे धाराशिव, प्रकाशचंद सोनी हिंगोली, जयप्रकाश दगडे ज्येष्ठ पत्रकार, मिलिंद एंबल, सामाजिक कार्यकर्ते हर्षदभाई शाह, भारतीय वनसेवेतील अधिकारी यश काळे यांना सन्मानित करण्यात आले. तसेच हस्तीमलजी बंब आणि माजी आ. ओमप्रकाशजी पोकर्णा यांना जैन रत्न सन्मानाने सन्मानित करण्यात आले. सामाजिक बांधिलकीचे भान ठेऊन सकल जैन समाजातील समाजोपयोगी कामांचा गौरव करून सन्मानप्राप्त व्यक्तीप्रती प्रेम व कृतज्ञता व्यक्त करणे हा आयोजनाचा मागचा उद्देश असल्याचे सचिव ऋषीकेश कोंडेकर यांनी सांगितले.

कार्यक्रमाला सकल जैन समाजातील ५०० पेक्षा अधिक बंधू-भगिनी उपस्थित होते. सुत्रसंचलन ऋषीकेश कोंडेकर यांनी, तर आभार रोहन कोंडेकर यांनी मानले. सकल जैन समाज एकीकरणासाठी चालविलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.




# स्त्रीवादाला नवपरिमाण देणारी कवयित्री- संगीता वाणी

ज्योतिर्मय साहित्य

संगीता वाणी या प्रेमकविता ,आध्यात्मिक तत्वज्ञानावर आधारीत भाव कविता ज्या सामर्थ्याने लिहीतात,त्याच सामर्थ्याने त्या गूढवादी कविताही



लिहीतात.मराठीत अरुण कोलटकर,ग्रेस यांच्या कविता जशा समजायला कठीण तशाच प्रकारच्या काही गूढ कविता वाणींच्या आहेत.व्यंजनेने अर्थबोध करुन घेण्याशिवाय वाचकाला पर्याय नसतो.या कवितेचे आणखी एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ही कवयित्री अल्पाक्षरत्व हा काव्यगुण कटाक्षाने पाळते. याशिवाय उच्च अशा उपमा, रुपकांचा, प्रतिमासृष्टीचा, प्रतिकांचा आविष्कार त्यांच्या कवितेत ठायी ठायी डोकावतो. त्यामुळे चिंतनशील वाचक असेल तर त्याच्यासाठी वाणींची कविता पर्वणी ठरते. कधी महानगरी तर कधी ग्रामीण वळणाची कविता लिहील्यामुळे त्यांनी स्वतःवर प्रादेशिकतेचा शिक्का बसून दिला नाही.

त्यांची औदुंबर नावाची अगदी छोटीशी कविता आहे.पण या कवितेतून कवयित्रीने मानवी जीवनाचे सार प्रकट केलेले आहे.एखाद्या कुशल कारागिराने अल्प सामुग्रीत एखादे शिल्प निर्माण करावे तसे कवयित्री अगदी मोजक्या शब्दांत जीवनाचे अत्युच्च तत्वज्ञान सांगून जातात.औदुंबराचे स्थिररुप,स्थितप्रज्ञता कवयित्रीच्या हृदयात रुंजी घालते.त्यामुळे तिला आपले जीवनच औदुंबरमय वाटते. जीवनाचे नाव औदुंबर ठेवणे ही सामान्य बाब नव्हे. कारण औदुंबराच्या सहवासात सदैव वास करणारी देवता म्हणजे भगवान दत्तात्रेय.दत्तात्रय हे त्रिगुणांचे प्रतिक, त्रैलोक्याचा राणा, की ज्याचे ध्यान सदैव ऋषि मूनी करतात! मी तू पणाची बोळवण करुन ऐक्यासनी बसविणारे ध्यानस्थ दत्तात्रय, त्यांचा वास जिथे असतो तो औदुंबर होय.संस्कृतमध्ये औदुंबराच्या वृक्षाला उदुम्बर असे नाव आहे. नऊ कुलवृक्षांपैकी हा एक कुलवृक्ष आहे. ज्यामध्ये कुलयोगिनी राहतात.(संदर्भ-कुलर्णव तंत्र-श्लोक ११.६६.६८)त्यानुसार कुलयोगिनी नेहमी कुलवृक्षांमध्ये राहतात. म्हणून अशा वृक्षांना त्रास होऊ नये त्यांचे भक्तीने स्वागत करावे, पूजा करावे अशी विविध धर्मांची नीत आहे.कवयित्री संगीता वाणी अशा संपन्न वृक्षाचे रुपक वापरतात. आपल्या जीवनाला या औदुंबराची उपमा देतात.

भावनेच्या पलिकडे,
उभा जीवनाचा औदुंबर!

कवयित्रीचे जीवन औदुंबरमय आहे. औदुंबर हे दत्तगुरुंचे तीर्थस्थान ! जिथे निर्मलता, शुध्दता म्हणजे शूचित्व,प्रेममय भक्ती असेल तिथेच देव वास करतात.एकदा नारद विष्णूला विचारतात तुम्ही कुठे वास करता? त्यावेळी विष्णूने दिलेले उत्तर फार ही शूचिता व प्रेमस्वरुप भक्ती अधोरेखीत करते.विष्णू म्हणतात,

नाऽहं वसामि वैकुंठे, योगीनाम् हृदय रवौ।मद्भक्त यत्र गायन्ती तत्र तिष्ठन्ती नारदः।।

म्हणजे वैकुंठ,योगी,यापैकी कोणतेच स्थान न आवडता जिथे श्रध्दा, भक्ती प्रेम आहे असे ठिकाण त्याला आवडते. दत्तगुरुंना अशाच शूचित्वाने भरलेल्या औदुंबराखाली, त्याच्या नित्य सहवासात रहायला आवडते. कवयित्री तर आपल्या जीवनाचे नाव औदुंबर ठेवते. औदुंबराच्या वृक्षाचे जसे अध्यात्मिक, सांस्कृतिक महत्व आहे तसे आयुर्वेदीय महत्वही खूप आहे. कवयित्री खान्देशातील असल्यामुळे त्यांच्यावर बालकवींच्या औदुंबर कवितेचाही प्रभाव नाकारता येत नाही.बालकवींच्या कवितेतील खालील ओळी कवयित्रीच्या मनोभावनांच्या जवळ जाणार्या आहेत की ज्यात बालकवी'' शेतमळ्यांच्या दाट गर्दीतून पुढे जाणार्या पायवाटेचा संदर्भ देतात.

प्रा.डॉ.दत्तात्रय प्र.डुंबरे
प्रमुख,
मराठी विभाग व भाषा संशोधन केंद्र,
विवेकानंद महाविद्यालय,छ.संभाजीनगर

त्यांचे हिरव्या समृध्द जीवनातून निघालेली पांढरी पायवाट हे रुपक समाजातील परित्यक्त्या, विधवा स्त्रियांसाठी वापरलेले आहे.तिला कोणताही आधार नसतो त्यामुळे जीवनाच्या एका क्षणाला ती कंटाळते आणि मृत्यूच्या काळ्याशार डोहात आपले जीवन समर्पित करण्यासाठी जाते.त्यावेळी सर्वसाक्षी परमेश्वराच्या रुपातील औदुंबर स्थितप्रज्ञ राहून ते पाहत आहे. ''असे विफल जीवनदर्शन बालकवींच्या औदुंबरात आहे.(संदर्भ-विकीपिडीया)

बालकवींची नायिका परिस्थितीशरण आहे.मात्र संगीता वाणींची नायिका विफल नाही.ती औदुंबराच्या आश्रयालाही जात नाही.ती स्वतःच औदुंबर बनते. अंतःकरण म्हणजे भावना नावाची मन,बुध्दी,चित्त,अहंकार या उपनद्यांना सामावून घेऊन जी नदी आहे,तिच्या काठावर कवयित्री औदुंबरमय जीवन जगते,की जिच्या शूचित्वाला भुलून दत्तात्रय तिच्या ठायी अखंड वास करतात.संगीता वाणींची नायिका परिस्थिती शरणत्व न पत्करता परिस्थितीवर सहज स्वार होते.

जीवन
नश्वर असले तरी
फिरुनी नवी जन्मेन
मी! ही दुर्दम्य
ईच्छाशक्ती तिच्यात आहे.तिच्या रक्षणार्थ हवा असणारा दत्त आपणहून तिच्या छायेत स्थिरावतोय.

संगीता वाणींचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे त्या सहजगत्या अल्प शब्दांत मोठे तत्वज्ञान सांगतात.आत्मा अमर आहे.आपण कपडे बदलतो तसं तो फक्त देह बदलतो.देह नश्वर आहे. नाशिवंत आहे हे वेद, पुराणे व गीता तत्वज्ञान कवयित्री फक्त दोन ओळींत सांगते.

''पानगळ ठरलेलीच,
जीवन मृत्यूच्या रेषेवर।।''

शंकराचार्य पुनरपि जननम् पुनरपि मरणम् ! याला संसार म्हणतात.जन्माला आला तो एक दिवस मरणारच! आणि जो मेला तो पुन्हा जन्माला येणार फक्त देह बदलून. कवयित्री पानगळ वर्णन करते ती शिशिरातली.पण वसंतात हा औदुंबर बहरणार आहे,नवी पालवी फुटणार आहे,नवे चैतन्य,नव्या कल्पना घेऊन पालवी फुटणार याचे प्रत्यक्ष वर्णन एकाही ओळीत नाही मात्र गूढार्थाने हेच ध्वनित होते.म्हणून निसर्गातील दृश्यांचा मानवी जीवनाशी जोडलेला अनुबंध म्हणजे वाणींची औदुंबर ही कविता होय! वरवर नैराश्य दाखविणारी असली तरी सकारात्मकतेचा गूढार्थाने होणारा आविष्कार येथे दिसतो.अर्थवाही व समर्पक विशेषणे ,शब्दमाधुर्य,पद लालित्य यांमुळे आलेली प्रासादिकता ही बालकविंच्या औदुंबराच्या पंक्तीत जाऊन बसते.

****

# जागल

ज्योतिर्मय साहित्य

नवा वर्ष अवर्षण घेऊनच आला. पेरणीपासूनच पावसाने हुलकावणी दिली. आभाळाकडे डोळे लावून बसलेल्या बळीराजाला सुखावणारा पाऊस पडलाच नाही. पडला तो पण वरवरची माती भिजवण करणारा. शेतकऱ्यांना आशा लावून पेरणीसाठी उद्युक्त करणारा. शेतकरी सुध्दा आशावादी. आज ना उदया पडेल या भरवशावर काळया मातीत खुशाल खत, बियाणे टाकून केवळ पावसाच्या प्रतिक्षेत बसलेला. पण वरुणराजाची कांही कृपा होईना. पाऊस पडावा यासाठी जे कांही जपतप करायचे ते झाले. अनवाणी पायाने एका दिवसात मारुतीला पाणी घालुन साकडे झाले. आषाढीच्या वारीमध्ये पांडुरंग कृपा करील व हमखास पाऊस येईल असे वाटत असताना आषाढी कोरडीच गेली. अधून मधून केवळ आंगण शिंपडावं तसे कधी कधी कांही शिडकावे देऊन पेरलेलं धान्य काठावर जीवंत ठेवण्याचं काम मात्र त्यांनी केलं होतं. अशाच रुपाने ओलावा टिकवून धरणाऱ्या कांही जमीनीमधील पिकांनी तग धरली आणि पिकं काढणीला आली. चहुकडे दुष्काळाचीच छाया होती. गुराढोरांनाही जगवता यावं यासाठी चारा नव्हता. त्यामुळे जे पीक आलं ते कुणाच्या घशात जाईल ही भिती होती. चोरांचा सुळसुळाट झाला. दिसेल ते ओरबडून नेण्याची मानसिकता झाली. त्यामुळे पिके काढणीला आल्यामुळे रावबांनी शेतात जागल टाकली.

जागल म्हणजे शेतातील पिकाच्या, धान्याच्या संरक्षणाकरीता जो पहारा दिला जातो त्यासाठी शेतातील मुक्काम. रावबा कधी जागलीवर राहिलेला नव्हता. शेतीमध्ये नवखा गडी, जागलीच्या अनेक गोष्टी मात्र त्यांनी ऐकलेल्या होत्या. चोरांच्या, भुताटकीच्या, जंगली प्राण्याच्या अनेक गोष्टी ऐकत आल्यामुळे मनात एक प्रकारची भिती होती. परंतु घरुन कुणीही सोबती नसल्याने हिंमत धरुन कसेतरी जागलीवर राहण्याची मानसिकता बनविली होती. दिवसासाठी शेतात बैठक होती. बैठकीला दोन तीन कुत्री सुध्दा होती. परंतु रात्री मुक्काम करुन पहारा देणे म्हणजे एक जोखमीचे काम वाटु लागले. सहकारी मित्र कशासाठी असावेत याचे महत्व पटु लागले. तसे त्यास सहकारी नव्हते असेही नाही परंतु कांही किरकोळ कारणाने, देवाणघेवाणीच्या मुळे थोडा दुरावा आला होता. जीवाला जीव देणारे सहकारी असलेच पाहिजेत असे रावबाला त्या जागलीवर वाटु लागले. दुरावलेल्या मनाने त्यांना जावून विनवणी तरी कशी करावी हे कोडे पडले. परंतु मनाने साथ नाही दिली. मन धिट करुन त्यांनी रात्र जागून काढली.

अमावस्येचे दिवस जसजसे जवळ येत होते तसा दिवसागणीक अंधार वाढत होता. रातकिडयांनी अंधार किर्रर करुन टाकला होता. अशा जागली ज्यावेळी पडतात तिथं जनावरं मुक्कामी असतात. नेमके अशाच वेळी गायी म्हशी व्यालुन लहान लहान वासरे दावणीला असतात. जंगली जनावरांना त्यांच गोष्टीची प्रतिक्षा असते. कोल्हे, लांडगे, जंगली श्वापदं अशावेळी भक्ष शोधण्यासाठी निघतात. तशीच एक भयानक रात्र आली. जागलीच्या थोडयाच अंतरावर कोल्हयांनी धुमाकुळ घातला. परंतु जागलीवरील कुत्र्यांच्या हिंमतीमुळे कोल्हयांनी दुरुनच निरोप घेतला. ती रात्र भयानकच होती. कधी नव्हे ते हे सर्व रावबा पाहत होता. कशीबशी रात्र संपली, सुर्योदय झाला आणि रावबाला आणखी एक रात्र मागे पडल्याचा दिलासा वाटला. दिवसभर रावबा त्याच चिंतेत होता. पिके हातात येण्यास किमान पंधरा दिवसाची जागल टाकणे गरजेचे होते. परंतु एकदा का जंगली श्वापदांना जनावरांचा वास लागला की ते कधीन कधी त्यावर घाला घालतील ही भिती रावबाला होती. त्याने पत्नीजवळ चिंता बोलून दाखवली. पत्नी म्हणाली, "जाऊ दया, जे नशीबात असेल तेवढे मिळेल, जीव धोक्यात घालुन काय मिळवायचे." रावबाच मन राहावलं नाही. अशा दुष्काळी दिवसामध्ये हातातोंडाशी आलेला घास कसा जाऊ दयावा असा विचार करुन रावबा पुन्हा जागलीवर गेला. तिथं मात्र त्याच्या जीवाभावाची तीन कुत्रेच होती. त्या कुत्र्यांच्या हिंमतीवर तो कशातरी रात्री काढत होता. रोज तसाच एक खेळ सुरु होता. कोल्हयांच्या टोळी जागलीच्या कांहीच अंतरावरुन मोठमोठयाने भितीदायक आवाज करीत होते. तेवढयाच ताकतीने कुत्रे त्यांचा सामना करीत होते.

एक आठवडा कसातरी संपलेला होता. त्या परिस्थीतीशी झगडण्याची थोडी ताकद रावबामध्ये आली होती. मात्र या बैठकीला दोनचार मित्रांचा सहारा असता तर कसे आनंदात दोन आठवडे गेले असते त्यांचा विचार करीत होता. सहकारी मित्रांना सुध्दा रावबाच्या जागलीची खबर लागली होती. रावबाच्या बायकोकडून सहकारी मित्रांच्या बायकोपर्यंत रावबाच्या मनाची घालमेल गेलीच होती. परंतु मनातील अडी सर्वांच्याच आड येत होती. त्यामुळे संबंध सुरळीत होत नव्हते.

आता पिके कापून झाली. एका जागेवर जमा करुन दोनतीन दिवसात रास करुन आपण यातून सुटु अशी मनाला समजूत देऊन रावबाचे मुक्काम सुरु होते. अशीच एक शांततामय भिती वाटणारी रात्र आली. दररोजच्या पेक्षा आजचे वातावरण कांही वेगळेच होते. दररोज कोल्हेकुई करणाऱ्या कोल्हयांनी आज पोबारा केला होता. जागलीवरचे कुत्रे सावधरितीने वातारवणाचा माग घेत होते. रात्रीचे दोन प्रहर संपले. आणि आजुबाजुनी माणसांची कुजबुज सुरु झाली. कुणाच्या हातात कुऱ्हाडी, कुणाच्या हातात कत्ती अशी हत्यारं असलेली हत्यारबंद माणसं जागलीच्या आजुबाजूस फिरु लागली. तो माग कुत्र्यांनी ओळखला होता. जंगली श्वापदांच्या बचावासाठी माणसांचा सहवास लाभावा अशी अपेक्षा ठेवणाऱ्या रावबाला आता माणसांचीच भिती जास्त वाटु लागली. आगीच्या ज्वाळांना पाहून जंगली श्वापदांना तर भिती घालता येते. परंतु माणुसकी सोडलेल्या आणि जंगली श्वापदापेक्षा क्रुर झालेल्या माणसांना कसे आवरायचे. मनात भितीचे कल्लोळ उठले. हे सर्व सोडून पळून जावे असाही मनात विचार आला. परंतु गांव आणि शेत यातील अंतर बरेच मोठे. तेही शक्य वाटत नव्हते. दुरवर कुजबुज करणारी माणसं जागलीच्या जवळ आली तशी कुत्र्यांनी त्यांच्यावर झेप घेतली. एका फटक्यात एक कुत्रा आडवा झाला. ते पाहून रावबाच्या अंगातील बळ संपलं होतं. जगण्याच्या अशा सोडून जे घडेल ते पाहण्याव्यतिरिक्त आता रावबाकडे दुसरा रस्ता नव्हता. अशातच गावाच्या दिशेने एक जमाव वेगाने जागलीकडं येत असलेला दिसला. चारही बाजुनं संकट आल्याचा भास रावबास झाला, परंतु कांही वेळामध्ये तो जमाव जागलीवर पोहोचला तशी ती चोरांची टोळी पसार झाली.



माधव सूर्यवंशी,
माकणीकर

मदतीला धावून आलेले रावबाचे मित्र होते. मनातील अंतरं संपली होती. डोळयातील अश्रुंचे बांध फुटले होते. अनावर अश्रुंनी रावबाला कांहीच सुचत नव्हतं. मित्रांच्या या उपकारानं एक नवं जीवन दिल्याची भावना रावबाला झाली होती.

अशी संकटं अनेक मार्गांनी येतात. संकट समयी येणारी माणसंच आपले खरे सहकारी असतात. त्यामुळे लहानसहान गोष्टींमुळे सहकाऱ्यांमधील, मित्रांमधील दुरावा वाढणार नाही याची काळजी घेणे आपल्याच हाती असते. ही कथा काल्पनिक आहे. परंतु खरे सोबती तेंव्हाच कळतात जेंव्हा संकटे येतात, एकटेपणा येतो. त्यामुळे मतभेद विसरून मित्र जवळ करा.

# माझ्या मराठीची काय बोलू कौतुके

ज्योतिर्मय साहित्य

ओळखलात ना मला ? होय, मी मराठी बोलतेय. तुमचीच मायबोली महाराष्ट्राची पारंपारीक भाषा. ज्या भाषेवर सर्वच मराठी भाषिक तसेच अभाषिक लोकांनी सुद्धा आजवर भरभरून प्रेम केलेत. श्रेष्ठ-कनिष्ठ, कलाकार-क्रीडापटू, साहित्यिक-शिक्षक, अधिकारी-कामगार, विद्यार्थी-तरुणाई, राजकारणी-समाजसेवक या सर्वच स्तरांवरून माझ्यावर आजवर जे प्रेम केले त्याबद्दल तुम्हां सर्वांचे खूप खूप आभार.

"मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा"

"आहे तितुके जतन करावे, पुढे आणिक मेळवावे"

"महाराष्ट्र राज्य करावे जिकडे तिकडे"

हे वाक्य जरी ऐकले तरी अंगावर काटा येतो. एवढे शक्तीवाण आणि सामर्थ्यवाण माझे शब्द आहेत आणि हे सर्व शक्य आहे ते फक्त आणि फक्त तुमच्या प्रेमामुळे आणि तुमच्या आदरामूळे. रामदास स्वामी शिवकाळात महाराष्ट्राला मिळालेले थोर संत, वर्तमानाचा व भविष्याचा वेध घेवुन आपले मत परखडपणे मांडणारे संत, इतर संत हे फ़क्त भक्ती व अहिंसक मार्गवरुन चालणारे होते. परंतु रामदासांनी परिस्थिती प्रमाणे कसे वागावे हे शिकवले. मराठी भाषा आणि मराठी माणसे यांची नाळ जोडली गेली ती फार वर्षांपूर्वीच. संत महाराज, शिवकालीन काळ, साहित्यिक काळ या सर्व काळांपासून मराठी भाषा आजही प्रगती पथावर आहे आणि त्यासाठी ऐतिहासिक वारसा हा एक भक्कम पुरावा आहे. आजवर मराठी भाषिक "महान व्यक्तिमत्त्वांनी" वेगवेगळ्या स्तरांवर आपले अमूल्य योगदान दिले आणि स्वतः सोबतच मला (मराठीला) एका उच्च स्तरावर नेऊन ठेवले. त्यापैकी काही निवडक उदाहरणे पुढीलप्रमाणे:





भूषण सहदेव तांबे
मुंबई

१. स्वराज्याची स्थापना करणारे पहिले शूरवीर: छत्रपती शिवाजी महाराज

२. भारताची राज्यघटना लिहिणारे महामानव: डॉ. बाबासाहेब आंबेडकर

३. पहिली शाळा काढणारे थोर समाज सुधारक: महात्मा ज्योतिबा फुले

४. पहिली महिला शिक्षिका: सावित्रीबाई फुले

५. पहिली महिला राष्ट्रपती: प्रतिभाताई पाटील

६. पहिली महिला सुप्रसिद्ध गायिका: लता मंगेशकर

७. पहिला महासंगणक निर्माते: डॉ. विजय भटकर

८. पहिला चित्रपट निर्माते: दादासाहेब फाळके

९. क्रिकेटमध्ये १० हजार धावा करणारा पहिला खेळाडू: सचिन तेंडुलकर

१०. पहिली महिला चिकित्सक: डॉ. आनंदीबाई जोशी

खरंच खूप अभिमान वाटतो मला जेव्हा यांसारखे दिग्गज लोक आपले नाव मोठे करतात त्यासोबतच मराठी संस्कृतीलासुद्धा त्या उच्च स्तरावर नेतात. त्यांच्या कर्तृत्वाचे नक्कीच माझ्या मनामध्ये नेहमीच कौतुक असेल.

बाकी उरले ते म्हणजे काही कडवट अनुभव. प्रत्येक गोष्टीला सकारात्मक तसेच नकारात्मक दृष्टिकोन असतात तसेच माझ्या बाबतीत सुद्धा आहे. खूप दिवसांपासून मनामध्ये एक खंत आहे ती म्हणजे काही लोक मराठी भाषिक असून सुद्धा हिंदी किंवा इंग्लिश मध्येच संवाद साधतात. ते फक्त म्हणजे त्यांचे स्टेटस जपण्यासाठी आणि स्वतः चा मान समाजात स्थिर राखण्यासाठी. असो, आणखीन एक गोष्ट होती, ती म्हणजे एका मुलीला हिंदी चित्रपटसृष्टीत चित्रपटासाठी ऑडिशन द्यायची होती. ऑडिशनच्या आधी ती तिचे नाव बदलते. कारण जर तिने स्वतःचे आडनाव आगरकर असे सांगितले असते तर समोरच्या डायरेक्टरला लगेच कळेल असते की ही मराठी भाषिक आहे आणि त्यामुळे तिचा अभिनय सुंदर असून देखिल तो तिला रिजेक्ट करू शकला असता. याच एका भीतीने चक्क ती स्वतःचे आडनाव आगरकर वरून शाह असे करून घेते. किती दुर्दैवाची बाब आहे ही ? एका चित्रपटात काम मिळावे म्हणून स्वतःचे आडनाव बदलून घेणे.

बाकीच्या राज्यांप्रमाणे महाराष्ट्रात कोणत्याच भाषेची सक्ती केली जात नाही. कारण येथे सर्व धर्म-पंथाचे लोक वास्तव करत असतात. पण, बाकीच्यां राज्यांमध्ये मात्र राज्यभाषेची फार सक्ती केली जाते आणि जर याचे कोणी पालन केले नाही, तर त्यास वाईट वागणूक दिली जाते. काही लोक महाराष्ट्रात राहूनही दुकानाच्या पाट्या इंग्लिश किंवा हिंदी मध्येच लिहितात. फार क्वचित असतील जे मराठी भाषेचा उपयोग करताना दिसतात. आजून एक आश्चर्याची गोष्ट म्हणजे महाराष्ट्रातील मराठी माणूस स्वतःच आपल्या पाल्याला मराठी शाळेत प्रवेश न घेता इंग्लिश माध्यमातून त्यास शिक्षण देतो. ही फार चिंताजनक बाब आहे आणि त्यामुळेच आज सर्व मराठी शाळा ओसाड पडू लागल्या आहेत. तरीही मला खूप अभिमान आहे की तुम्ही सर्वजण जो मान देता त्यामुळेच आज मराठी भाषा ही फक्त महाराष्ट्रातच नाही तर साता समुद्रापलीकडे पाश्चिमात्य देशांत सर्वत्र जगभर पसरली आहे. तुमचे हे माझ्यावरचे अफाट प्रेम आणि आदर असेच सदैव राहूदेत.

जाता-जाता फक्त एक गोष्ट सांगते, ती म्हणजे सर्वत्र असे म्हणतात की मराठी माणूसच मराठी माणसाचे पाय ओढतो आणि त्याची प्रगती थांबवतो. माझी तुम्हां सर्वांकडे एक कळकळीची विनंती आहे की काहीही झाले तरीही कोणीही आप-आपसात वादविवाद करू नये उलट एकमेकांस सहकार्य करावे. 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' या संत तुकाराम महाराजांच्या सुंदर वचनाप्रमाणे गरजूंना आपणाकडून जे-जे शक्य होईल ती-ती मदत आपण सर्वांनी केली पाहिजे. आपली सर्वांची एकजूटच हीच आपली खरी ताकद असेल आणि आपले हेच सामर्थ्य मराठी माणसाच्या विकासासाठी अतिशय पोषक ठरेल.

***

# एका महिलेच्या संघर्षांची कहाणी "एक भाकर, तीन चुली"

ज्योतिर्मय साहित्य

माझ्या मित्रानी किरण माने यांनी मला ही




कादंबरी भेट म्हणून दिली." गरीबी, संघर्ष किंवा साधेपणाच्या जीवनशैलीचे प्रतीक, मी नुकतीच हे पुस्तक वाचले आणि त्याचा मला खूप खोल परिणाम झाला. ही कथा अत्यंत भावनिक आणि दुःखद आहे, जी एका महिलेच्या संघर्षांची कहाणी आहे. तिच्या आयुष्यात तिने अनेक आव्हानांचा सामना केला आणि तीने केलेली बलिदाने खूपच आश्चर्यचकित करून सोडणारी होती. हे एक ह्रदय हेलावणारे पण प्रभावशाली कथेचे उदाहरण आहे, जे वाचनाच्या नंतरही आपल्या मनावर ठळक ठरते."

शुद्धोधन गवई
विक्रोळी, मुंबई
९९८७७०८७७८

जे काही मी आधी वाचले आहे त्यापेक्षा खूप वेगळं आणि अनोखं आहे. हे एक अत्यंत आव्हानात्मक आणि विचारप्रवर्तक पुस्तक आहे. कथा खूप हृदयस्पर्शी आहे, हे पुस्तक वाचताना निरवंध मन आणि कोरड्या डोळ्यांनी वाचणे अत्यंत कठीण आहे.

हे या कथेतली नायिका एक अत्यंत अद्भुत महिला आहे, जी तिच्या जीवनभर असहनीय दुःख आणि वेदना सहन करते. प्रत्येक दिवस नवीन आव्हानांसह येतो, तरीही ती अनेकदा भाकरीचा तुकडा न घेता त्या आव्हानांचा सामना अप्रतिम धैर्याने करते. तिच्या बलिदानांन आणि धैर्याला विलोभनीय म्हणावे लागेल."

पोटाची खळगी भरण्यासाठी चाललेली धडपड, छळ, हे तिच्या वाटेला आलेलं पाहून मन खदखदत होतं. गळा दाटून येत होता. देवा झिंझाड (बबु ) यांनी खूप संवेदनशीलपणे ही कथा मांडली आहे . माय लेकराची झालेली परवड काळीज पिळवटून टाकणारी आहे. अन्न, वस्त्र, निवारा, पाणी या मूलभूत गरजांसाठी रोजचा संघर्ष... आरोप, अपमान, बदनामी आणि न केलेल्या चुकांसाठी शिक्षा हे मात्र अगदी पाचवीला पुजलेलं... कधीतरी कुठेतरी एखादा आशेचा किरण दिसायचा पण क्षणार्धात आभाळ पुन्हा गच्च भरून यायचे... आणि त्या संकटांच्या वादळात प्रत्येक वेळी नव्याने उभे रहायचे .... प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात म्हणजे नेमकं काय? संघर्ष आणि जिद्द म्हणजे काय याचा खरा अंदाज हे पुस्तक वाचताना येतो. यातली नायिका अफाट ताकदीची आहे. एखाद्या सिनेमाला लाजवेल असा तिचा संघर्ष आहे. तिच्या अख्ख्या आयुष्याची वाताहत होऊनही राखेतून फिनिक्स होऊन संकटांवर तुटून पडणारी ही मर्दानी बळीराणी आहे असे मला वाटते. अक्षरशः एखाद्या चित्रपटाची गोष्ट असावी असे भयानक कथानक पुढे सरकत राहते... आपण वाचत जातो. गुंतत जातो. त्यातून बाहेर पडता येत नाही. पुस्तक वाचताना पुस्तकाच्या शीर्षकाचा अर्थ अर्ध पुस्तक वाचुन झाल्यावर मला कळाला.

***

# वक्तृत्वात व्हा तरबेज

ज्योतिर्मय साहित्य

विद्यार्थी मित्रहो वक्ता दशसहेस्रु श्रोता असे म्हटले जाते.दहा हजारात एखादा वक्ता घडतो.वक्तृत्व ही एक सुंदर अशी कला आहे.या कलेच्या माध्यमातून तुम्ही लाखो लोकांच्या मनावर अधिराज्य गाजवू शकता. आपले विचार आणि मत लोकांना पटवून देऊ शकता. आपल्या भाषणाने लाखोंच्या सभा गाजविलेल्या महाराष्ट्राला उत्तम वक्त्यांची खाण लाभली आहे. आचार्य प्र.के.अत्रे, प्राचार्य शिवाजीराव भोसले पासून ते आजच्या घडीला इंद्रजित देशमुख, नितीन बानगुडे पाटील अशा अनेक पट्टीच्या वक्त्यांनी वक्तृत्वाच्या जोरावर आपली स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

मुलांनो वक्तृत्व ही कला साध्य करण्यासाठी तुम्ही शालेय जीवनापासून प्रयत्न करा. भरपूर मेहनत घ्या. सुरुवातीला चुका होतील पण घाबरु नका.पुन्हा जोमाने प्रयत्न करा. एक दिवस तुम्ही उत्तम वक्ता व्हाल. यासाठी खालील बाबी लक्षात ठेवा.

१.भाषणासाठी छोटे छोटे विषय घेऊन न घाबरता बोलायला शिका. उदा. माझी आई, माझी शाळा, माझे गाव, इ...

२.भाषण पाठांतरासाठी वेळ द्या. मनापासून सराव करा.

३.सुरुवातीला घरातील माणसांसमोर भाषण म्हणा. नंतर घरात आरशासमोर उभे राहून भाषणाचा सराव करा.

४.भाषणासाठी आत्मविश्वासपूर्वक उभे रहा. सुरुवातीलाच समोरील लोकांकडे बघा. म्हणजे तुमची भीती दूर होईल.

५.आपले शब्दोच्चार सुस्पष्ट असावेत.

६.भाषण करताना आवश्यकतेनुसार आवाजात चढउतार करा.

७.चेहऱ्यावरील हावभाव व हातवारे योग्य असावेत. तुमचे भाषण प्रभावी होण्यासाठी महत्त्वाचे अत्यंत महत्त्वाचे आहे.

८.सतत वाचन करा. भाषणासाठी तुमच्याकडे शब्दसंपत्ती असायला हवी.



विद्यार्थ्यांशी हितगुज
लक्ष्मण जगताप,
बारामती
संपर्क : ९४२३२ ४९९९६

९.भाषणाचे व्हिडीओ बनवा. आपल्या होणाऱ्या चुका पहा.पुढील वेळी चुका टाळा.

१०.अनावश्यक हालचाली करु नका. उदा. मध्येच माईक पकडणे, शर्टचे बटण पकडणे, खिशात हात घालणे इ. ११.प्रत्येक नवीन भाषणाच्या वेळी नव्याने चांगली तयारी करा.

१२.भाषण सादरीकरण करताना वेळेचे भान ठेवा.

१३.आपल्या भाषणात समरस व एकरुप व्हा.भाषण म्हणजे नुसते पाठांतर वाटता कामा नये.

१४.भाषण तयार करताना गरजेनुसार सुभाषिते, काव्यपंक्तीचा वापर करा. १५. मान्यवर वक्त्यांची भाषणे वेळ काढूनआवर्जून ऐका.

१६. भाषणासाठी आपला आवाज महत्त्वाचा आहे.त्यासाठी आपल्या घशाची काळजी घ्या.




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559